# शेळीपालनाच्या नावाखाली ड्रग्ज विक्री

## कर्जतच्या फार्महाऊसवर छापा : ११ कोटींचे एमडी ड्रग्ज जप्त; सहाजणांना अटक

**नेरळ : पुढारी वृत्तसेवा**

कर्जत तालुक्यातील मौजे कशेळे हद्दीतील एका फार्महाऊसमध्ये शेळीपालनाच्या नावाखाली सुरु असलेल्या ड्रग्ज निर्मिती अड्ड्यावर मुंबई पोलिसांनी धाड टाकली. छाप्यात या फार्महाऊसमधून ११ कोटींचे एमडी ड्रग्ज जप्त करण्यात आले. तसेच सुमारे एक कोटींचा कच्चामाल पकडण्यात आला. याप्रकरणी सहाजणांना अटकही करण्यात आली.

रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील मौजे कशेळे गावाच्या हद्दीतील असलेल्या सावली फार्महाऊसवर मुंबई पोलिसांनी छापा टाकला. या छाप्यादरम्यान फार्महाऊसमध्ये ड्रग्ज फॅक्टरी सुरु असल्याचं समोर आलं आहे. तसेच या फार्म हाऊसमध्ये शेळीपालनाचा व्यवसाय सुरू असल्याचेही भासवण्यात येत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले आहे. मुंबई पोलिसांच्या छाप्यात या फार्महाऊसमधून ११ कोटींचे एमडी ड्रग्ज जप्त करण्यात आले. तसेच सुमारे एक कोटींचा कच्चा माल जप्त करण्यात आला आहे. तर या प्रकरणात विक्रेत्यापासून उत्पादक असे सहा जणांना ताब्यात घेण्यात आलं आहे.

मुंबई पोलिसांनी कशेळे येथील एका फार्महाऊसवर धाड टाकत मोठ्या प्रमाणात ड्रग्ज जप्त केले. तसेच सहाजणांना अटकही केली.

### असा झाला पाठपुरावा

मुंबई पोलिसांनी मार्च महिन्यात चेंबूरमध्ये ड्रग्ज विक्री करणाऱ्या एका तरुणाला अटक केली होती. त्याच्याकडे ४५ ग्रॅम एमडी ड्रग्ज सापडले. ड्रग्ज त्या तरुणापर्यंत कसे आले, याचा तपास पोलिसांनी सुरु केला. त्यानंतर ड्रग्ज विक्रेत्यापासून ते पुरवठादारांपर्यंत पोहोचले. पुढे मग तस्करी करणाऱ्यांपासून ड्रग्जची निर्मिती करणाऱ्यांपर्यंत ते पोहोचले. सध्या या प्रकरणात सहा आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरु आहे. या प्रकरणात आणखी काही जणांना अटक होण्याची शक्यता पोलीसांकडून वर्तवली जात आहे.

# पेण अर्बन बँक फसवणूक झालेल्या ठेवीदारांचा वनवास संपेना

## ५९८ कोटी वसुलीचा घोटाळा; प्रशासनाकडूनही बेफिकीरी; आतापर्यंत केवळ ३० कोटी मिळाले

**रायगड : जयंत धुळप**

१४ वर्षापूर्वी उघडकीस आलेल्या पेण अर्बन बँकेच्या ५९८ आर्थिक घोटाळा प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने वसुली बाबत आदेश देवूनही रायगड जिल्हा प्रशासन कोणत्याही प्रकारे कार्यवाही करित नसल्याने बँकेचे ठेवीदार आजही वाऱ्यावरच असून, त्यांच्यामध्ये संतापाची लाट उसळली असल्याची माहिती पेण अर्बन बँक ठेवीदार संघर्ष समितीचे अध्यक्ष तथा मुंबई उच्च न्यायालय नियुक्त समितीमधील ठेवीदार प्रतिनिधी नरेन जाधव यांनी 'दैनिक पुढारी'शी बोलताना दिली आहे.

रायगड जिल्ह्यातील पेण अर्बन बँकेचा बनावट कर्ज खाती करुन करण्यात आलेला एकूण आर्थिक घोटाळा ७५८ कोटी रुपयांचा तपासात निष्पन्न झाला. ठेवीदारांचे पैस परत मिळावे या करिता मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेच्या सुनावणीच्या वेळी या ७५८ कोटी रुपयांच्या घोटाळ्यापैकी ५९८ कोटी रुपयांची आर्थिक अफरातफर असल्याचे उच्च न्यायालयात सुनावणी दरम्यान स्पष्ट झाले. आणि या रकमेच्या वसुलीसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील पेण अर्बन बँक विशेष कृती समितीची स्थापना करण्यात आली. याच दरम्यान बँकेकडे असलेली आणि प्रारंभीच्या टप्प्यात वसूल करण्यात आलेली नियमित कर्ज रक्कम अशी एकूण ३० कोटी रुपयांच्या रकमेतून १० हजार आणि २५ हजार रुपये ठेव असलेल्या एकूण २३ हजार ठेवीदारांना न्यायालयाच्या आदेशान्वये ही ३० कोटाची त्यांची ठेव रक्कम परत करण्यात आली आहे. गेल्या तीन ते चार वर्षांत समितीचा सभाच होत नसल्याने या आर्थिक अफरातफरीच्या रकमेच्या वसुलीबाबत नेमकी काय परिस्थिती आहे आणि ठेवीदारांना त्यांचे पैसे परत कधी मिळणार याबाबत कोणतीही शाश्वतीच राहीली नाही.

# उल्हासनगर महापालिकेने न झालेल्या रस्त्याचे बिल केले अदा

## महानगरपालिका विरुद्ध स्थानिकांचे बेमुदत उपोषण

**उल्हासनगर : पुढारी वृत्तसेवा**

शहरातील गुलराज टॉवर ते वडोलगाव रस्त्याचे काम पुर्ण न होता ठेकेदाराला एक कोटी बिल अदा केले म्हणुन शहर अभियंता संदिप जाधव यांच्यावर कारवाई करावी या मागणीसाठी पॅनल १२ च्या माजी नगरसेविका सविता तोरणे, गजानन शेळके, समाजसेवक शिवाजी रगडे व फिरोज खान हे आमरण उपोषण सुरू केले आहे. माजी नगरसेवक महादेव सोनवणे, भगवान मोहिते, दशरथ चौधरी, रामेश्वर गवई यांच्या हस्ते बुधवारी सकाळी महापुरुषांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन उपोषणाला सुरवात करण्यात आली.

उल्हासनगर कॅंप ३ येथील पॅनल क्रमांक १२ गुलराज टॉवर ते वडोलगाव पूला पर्यंत रस्ता अद्यापही पूर्णपणे बनलेला नाही. तरी देखील त्या रस्त्याचे काम पूर्ण न होता शहर अभियंता यांनी ठेकेदार कंपनीला एक कोटीचे बिल दिल्याचा आरोप राष्ट्रवादीचे प्रवक्ते शिवाजी रगडे यांनी केला आहे. या रस्त्याचे काम प्रत्यक्षात सुरू न झाल्याने बुधवारपासून पॅनल क्रमांक बाराच्या माजी नगरसेविका सविता तोरणे रगडे, माजी नगरसेवक गजानन शेळके, शिवाजी रगडे, फिरोज खान, सुमनताई शेळके, शालिनीताई

गायकवाड, रवींद्र केणे, गजानन म्हात्रे, प्रकाश म्हात्रे या समस्त ग्रामस्थांच्या वतीने आमरण उपोषण करण्याचा इशारा वजा निवेदन उल्हासनगर महापालिका आयुक्तांना दिले होते. मात्र सदर रस्त्याचे काम अद्याप ही सुरु केले नसल्याने आज पासुन आमरण उपोषण सुरु करण्यात आले आहे.

या निवेदनाची दखल घेत आयुक्तांनी रस्त्याचे काम लवकरात लवकर सुरू करण्याचे आदेश देखील दिले होते. परंतु संदिप जाधव यांनी आयुक्तांच्या आदेशाला केराची टोपली दाखवून त्या रस्त्याचे सुरु केले नाही. त्यामुळे आम्हाला उपोषणाचा मार्ग स्विकारावा लागला, असे शिवाजी रगडे यांनी सांगितले. या उपोषणाला सर्व पक्षांनी पाठिंबा दिला असुन प्रत्यक्षात रस्त्याचे काम सुरु होत नाही तो पर्यंत उपोषण सोडणार नाही, असा निर्धार व्यक्त केला.


PRIME FOCUS LIMITED

**प्राइम फोकस लिमिटेड**

**नोंदणीकृत कार्यालय :** प्राइम फोकस हाऊस, सिटी बँकेसमोर, लिंकिंग रोड, खार (पश्चिम), मुंबई - ४०० ०५२. **दूरध्वनी :** +९१ २२ - २६४८४९००
**वेबसाइट :** www.primefocus.com **सीआयएन :** L92100MH1997PLC108981

**दि. ३१.०३.२०२५ रोजी संपलेली तिमाही व वर्षाकरिताच्या लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांचा (स्थायी व एकत्रित) अहवाल**

दि. ३१.०३.२०२५ रोजी संपलेली तिमाही व वित्तीय वर्षाकरिताच्या कंपनीच्या लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांना (स्थायी व एकत्रित) प्राइम फोकस लिमिटेडच्या (कंपनी) संचालक मंडळाद्वारे मंगळवार, दि. २७.०५.२०२५ रोजी आयोजित सभेमध्ये मान्यता देण्यात आली आहे.

लेखापरीक्षकांच्या अहवालासमवेत वरील निर्देशित लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्ष हे कंपनीची वेबसाइट http://www.primefocus.com/financial-results-conclusion-meeting-board-directors वर तसेच स्टॉक एक्सचेंज वेबसाइट www.bseindia.com व www.nseindia.com वर उपलब्ध आहेत तसेच ते क्यूआर कोड स्कॅन करूनही प्राप्त करता येऊ शकतील.

**प्राइम फोकस लिमिटेड करिता**
**सही/-**
**नरेश मल्होत्रा**
**अध्यक्ष व पूर्णवेळ संचालक**
**डीआयएन : ००००४५९७**

**दिनांक : २७.०५.२०२५**
**ठिकाण : मुंबई**

वरील माहिती ही भारतीय प्रतिभूती व विनिमय मंडळ (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ चे विनियमन ४७ नुसार आहे.


# फेरफार नोंदीसाठी लाच; 'त्या' तिघांवर कारवाई सुरू

**मंडणगड : पुढारी वृत्तसेवा**

मंडणगड तहसील कार्यालयातील शेतजमीनीचा फेरफार नोंद करुन तसा सातबारा उतारा देण्यासाठी पैसे घेतल्याप्रकरणी मंगळवारी (२७ मे) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या सापळ्यात अडकलेल्या महसूलच्या तिघांविरोधात बुधवारी उशिरापर्यंत गुन्हा दाखल व अटकेची प्रक्रिया सुरु असल्याची माहिती लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरीचे पोलीस उप अधीक्षक अविनाश पाटील यांनी माध्यमांना दिली.

शेतजमिनीचा फेरफार नोंद करून तसा सातबारा उतारा देण्यासाठी पैसे घेतल्याप्रकरणी २७ मे २०२५ रोजी तहसील कार्यालयाच्या आवारात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या कारवाईत मंडल अधिकारी म्हाप्रळ अमित शिगवण, म्हाप्रळ ग्राम महसुल अधिकारी (अतिरिक्त कारभार सोवेली सजा) श्रीनिवास श्रीरामे, व उपकोषागार कार्यालय मंडणगड येथील शिपाई मारुती भोसले यांना तीस हजार रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडले होते. सातबारा उतारा संबंधित मंडल अधिकारी तलाठी यांच्याकडून करून देतो, असे सांगून सदर कामाकरिता मारुती भोसले यांनी तक्रारदार यांच्याकडून ५० हजार रुपयांची मागणी केली अशी तक्रार तक्रारदाराने केली आहे. तक्रार देण्यापूर्वी यापैकी ४५ हजार रुपये मारुती भोसले यांने ऑनलाइन स्वीकारले. तक्रारदार यांच्याकडे प्रलंबित काम पूर्ण करून देण्यासाठी २७ मे रोजी पडताळणी दरम्यान तीस हजार रुपये लाचेची मागणी केली.

# भरपावसात करूळ घाटात बर्निंग कंटेनरचा थरार

**वैभववाडी : पुढारी वृत्तसेवा**

बांदा येथून डोझर मशीन घेऊन सांगली येथे जाणाऱ्या कंटेनर करूळ घाट चढत असताना भर पावसात अचानक पेटला. यात कंटेनरची केबीन जळून खाक झाली. ही घटना बुधवारी सकाळी ७ वा. च्या सुमारास घडली. या घटनेमुळे करूळ घाटमार्गातील वाहतूक सुमारे दोन तास वाहतूक ठप्प झाली होती. परिणामी घाटात दोन्ही बाजुने वाहनांच्या लांबचलांब रांगा लागल्या होत्या. कोल्हापूरकडे जाणाऱ्या एसटी गाड्या करुळ चेक नाका याठिकाणी थांबविण्यात आल्या होत्या. या घटनेत कंटेनर चालक बालबाल बचावला आहे. दुपारी अपघातग्रस्त कंटेनर बाजूला केल्यानंतर घाटातील वाहतूक पुर्ववत झाली. टँकरची आग वेळीच विझविण्यात यश आल्याने कंटेनरमधील डोझर मशीन सुस्थितीत आहे. या महिन्याच्या सुरूवातील २ मे रोजी करुळ घाटात उका कारने असा अचानक कारने पेट घेतला होता.त्या घटनेत कार जळून खाक झाली होती. त्या नंतर करूळ घाटात वाहन पेटण्याची महीनाभरातील ही दुसरी घटना आहे.


**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ** म्हाडा MHADA

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ

**ई-निविदा सुचना क्र. :- का. अ. (शहर)/मुं.झो.सु.मंडळ/ ई-निविदा/२४/२०२५-२६**

कार्यकारी अभियंता [ शहर ] विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) **खोली क्र. ५३९, चौथा मजला,** गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१ (दुरध्वनी क्र. ०२२ ६६४०५४८४) यांनी योग्य वर्गवारी तथा शासकीय किंवा निमशासकीय नोंदणीकृत ठेकेदाराकडून एकूण **०२** कामाकरीता बी-१ (टक्केवारी) नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागविण्यात येत आहेत. विस्तृत ई-निविदा सूचना व निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळ **http://mahatenders.gov.in**, वर उपलब्ध असतील. निविदा विक्री **दिनांक ३०.०५.२०२५ सकाळी १.०० पासून दिनांक ०६.०६.२०२५ सायंकाळी ५.३५** पर्यंत राहील. निविदा सूचनेबाबत शुध्दिपत्रक/बदल असल्यास फक्त **http://mahatenders.gov.in**, संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता (शहर)/मुं.झो.सु. मंडळ यांनी राखून ठेवला आहे.

Follow us: @mhadaofficial

**सही/-**
**कार्यकारी अभियंता (शहर), मुं.झो.सु. मंडळ, मुंबई**

CPRO/A/432
म्हाडा-गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था



**प्रसिद्धी**
**कर्जवसुली न्यायाधिकरण जबलपूर,**
**२ रा व ३ रा मजला, संचार विकास भवन (बीएसएनएल बिल्डिंग), मुख्य टपाल कार्यालयाजवळ, रेसिडेन्सी रोड, जबलपूर - ४८२००१.**
**ओ. ए. नं. १०३/२०२३**

**स्टेट बँक ऑफ इंडिया** ..... **अर्जदार**
**वि.**
**इन्फुटेक हेल्थ केअर** ..... **प्रतिवादी**

प्रति,
**१. इन्फुटेक हेल्थ केअर लिमिटेड ए)** ई२१०, २ रा मजला, क्रीस्टल प्लाझा, ऑफ न्यू लिंक रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई -४०००५३, महाराष्ट्र. **बी)** ३४०, लक्ष्मी प्लाझा, लक्ष्मी इंडस्ट्रियल इस्टेट, न्यू लिंक रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई-४० ००५३, महाराष्ट्र. **सी)** श्री गणेश चेंबर्स, नवलखा क्रॉसिंग, एबी रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई-४०००५३, महाराष्ट्र.
**२. श्री. मनोहर लाल गुप्ता,** श्री. उमाशंकर गुप्ता यांचे पुत्र, राहणार ९, जानकी नगर, एनएक्स, इंदोर-४२५००१.
**३. श्री. विनोद कुमार गुप्ता,** श्री. न्यारसी लाल गुप्ता यांचे पुत्र, राहणार ११, जानकी नगर, एनएक्स, इंदोर-४२५००१.
**४. श्री. गोविंद दास गर्ग,** श्री. फकीर चंद गर्ग यांचे पुत्र, राहणार ५ , आनंद बगीचा अगरवाल नगर, इंदोर ४५२००१.
**५. श्री. अनिल मित्तल,** दिवंगत श्री. कुलवंतराय मित्तल यांचे पुत्र, राहणार ३३०, ए.डी. स्कीम नं. ७४-सी, विजय नगर, इंदोर-४५२००१.
**६. इंडियन ओव्हरसीज बँक,** मुख्य कार्यालय : ७६३, अण्णा सराई, चेन्नई व अन्य शाखांपैकी एका शाखा कार्यालयाचा पत्ता : जीटी रोड, लल्ली निवास, जालंधर

**प्रसिद्धी**

ज्याअर्थी **ओए १०३/२०२३** सन्माननीय सहाय्यक निबंधक यांच्या समक्ष दि. २०.०२.२०२३ रोजी सूचिबद्ध करण्यात आले होते. ज्याअर्थी तुमच्या विरोधात कर्ज रक्कम दि. **२६.१२.२०२२** रोजीनुसार **रु. ६०,५४,८१,६६८.३९** अधिक त्यावरील खर्च व पुढील व्याज रकमेच्या (दस्तावेजांच्या प्रतींसमवेत अर्ज आदी जोडलेले आहे) वसुलीकरिता तुमच्या विरोधात दाखल करण्यात आलेल्या ओए अंतर्गत कायद्याचे अनुच्छेद १९ (४) अंतर्गत समन्स/सूचना जारी करण्यास सदर सन्माननीय न्यायालयास संतुष्टी होत आहे.
कायद्याचे अनुच्छेद १९ च्या उप-अनुच्छेद ४ च्या अनुपालनांतर्गत तुम्ही प्रतिवादी यांना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत :
१) सदर समन्सची सेवा जारी झाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत मागणी केलेले अनुतोष का मंजूर करण्यात येऊ नयेत याचे कारण द्यावे.
२) मूळ अर्जाच्या अनुक्रमांक ३ए अंतर्गत अर्जदारांद्वारे विहित मालमत्ता व संपत्तींव्यतिरिक्त अशा मालमत्ता वा संपत्तींचा तपशील घोषित करणे.
३) मालमत्तांच्या जप्तीकरिताच्या अर्जाची सुनावणी व वालसात प्रलंबित असल्याने, मूळ अर्जाच्या अनुक्रमांक ३ए अंतर्गत प्रतिभूत संपत्ती किंवा घोषित केलेल्या अशा अन्य संपत्ती व मालमत्तांसंदर्भात व्यवहार करणे वा त्यांची वासलात लावण्यास तुम्हाला प्रतिबंध करण्यात येत आहे.
४) तुम्हाला प्रतिभूत हितसंबंध निर्मित केलेल्या व/वा मूळ अर्जाच्या अनुक्रमांक ३ए अंतर्त विहित वा घोषित अन्य संपत्ती वा मालमत्तांची न्यायाधिकरणाच्या पूर्व संमतीविना व्यवसायाच्या सर्वसाधारण कामकाजाव्यतिरिक्त विक्री, भाडेकरार वा अन्य स्वरूपात हस्तांतरण करता येणार नाही.
५) व्यवसायाच्या सर्वसाधारण कामकाजाअंतर्गत प्रतिभूत संपत्ती वा अन्य संपत्ती व मालमत्तांच्या विक्रीद्वारे प्राप्त विक्री रकमेकरिता तुम्ही बांधील असाल व अशी विक्री रक्कम तुम्ही अशा संपत्तींवर प्रतिभूत हितसंबंध धारक असलेली बँक वा वित्तीय संस्थांकडे देखभालीत खात्यामध्ये जमा करावी.
तुम्हाला असेही निर्देश देण्यात येत आहे की तुम्ही तुमच्या लेखी म्हणण्याची प्रत अर्जदारांना सादर करावी व दि. **३०.०९.२०२५ रोजी स. १०.३० वाजता** रजिस्ट्रार यांच्या समक्ष उपस्थित राहावे अन्यथा तुमच्या अनुपस्थितीत अर्जावर सुनावणी होऊन निर्णय देण्यात येईल.
माझी सही व सदर न्यायाधिकरणाच्या शिक्क्यानिशी दि. **२३.०५.२०२५** रोजी जारी.
न्यायाधिकरणाच्या आदेशाद्वारे

शिक्का

**सही/-**
**निबंधक**
**कर्जवसुली न्यायाधिकरण, जबलपूर**



**महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, वरळी, मुंबई - ४०००३०, मार्फत खालील कामांकरीता बांधकामामध्ये अनुभवी असलेल्या कंत्राटदारांकडून 'नमुना सी म्हणजे ठोक पध्दतीची वस्तु व सेवा कर वगळून (Lumpsum)' ई-निविदा मागविणेत येत आहे.**

**ई-निविदा सुचना क्र. सी-०८, वर्ष २०२५-२६**

**" सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, यांचेकरीता २०० क्षमतेचे परदेशी नागरीक स्थानबध्दता केंद्र, राज्य राखीव बल गट क्र. ११ बाळेगाव कॅम्प, नवी मुंबई येथे सर्व पायाभूत सुविधांसह बांधणे. "**

- **ऑनलाईन को-या ई निविदा प्रपत्राची रक्कम : रुपये ३,५४०/-( १८ टक्के जीएसटीसह ना परतावा योग्य)**
- **ऑनलाईन बयाणा रक्कम : रुपये ३३,२८,८८७ /-**
- **कामाची अंदाजित रक्कम वस्तु व सेवा कर वगळून- रुपये ३३,२८,८८,६६९ /-**

को-या निविदा प्रपत्राची रक्कम व बयाणा रक्कम महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाचे ऑनलाईन **"पेमेंट गेटवे"** द्वारेच स्वीकृत केली जाईल.
को-या ई- निविदा सूचना व ई- निविदा नकाशे यांची नक्कल (Downloading) करणे/ विक्रीकरण https://mahatenders.gov.in/nicgep/appया संकेतस्थळावर दिनांक २९/०५/२०२५ रोजी १७.०० वाजलेपासून उपलब्ध होतील.
संपर्कासाठी दूरध्वनी क्र. (Help desk no) १८००-३०७०-२२३२ व भ्रमणध्वनी क्र. ७८७८१०७९८५, ७८७८१०७९८६

**रा. मो. गोसावी**
**मुख्य अभियंता**
**म.रा.पो.गृ. व क.म.मर्या., मुंबई.**



**कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, कल्याण**

**ई-निविदा सूचना क्र. ०१/२५-२६**

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या सर्व समावेशक आरक्षणा अंतर्गत कैलास गार्डन कल्याण पश्चिम येथे महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या जागेवर मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल उभारणेकरिता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणेकरिता निविदा प्रसिध्द करण्यात येत आहे.

| ई-निविदा क्र. | तपशील | कोरे फॉर्म फी रुपये + जीएसटी १८% | अनामत रक्कम रुपये | कोरे फॉर्म विक्रीची तारीख | निविदा स्विकृतीचा अंतिम दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या सर्व समावेशक आरक्षणाअंतर्गत कैलास गार्डन कल्याण पश्चिम येथे महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या जागेवर मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल उभारणेकरिता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणेकरिता निविदा प्रसिध्द करण्यात येत आहे. | ५७००/- + १०२६/- = ६७२६/- | रू.९५,०००/- | दि.२९/०५/२०२५ ते दि.१२/०६/२०२५ | दि.१२/०६/२०२५ दु.२.०० वाजेपर्यंत. |

१- निविदा फॉर्म Website http://mahatenders.gov.in यावर उपलब्ध आहे.
२- उक्त निविदापैकी शक्य झाल्यास, सदर निविदा दि. १३/०६/२०२५ रोजी दु. ३.०० नंतर उघडण्यात येतील.
३- प्रि-बीड मिटींग दि. ०५/०६/२०२५ रोजी दु. ०३.०० वाजता मा. अतिरिक्त आयुक्त - १, मेन बिल्डींग, कडोंमपा मुख्यालय, शंकरराव चौक, कल्याण पश्चिम यांच्या दालनात आयोजित करण्यात येईल.
४- निविदा फॉर्मची विक्री पोस्टाद्वारे करण्यात येणार नाही.
५- निविदा फॉर्म स्विकारण्याचे वा नाकारण्याचे अधिकार मा. आयुक्त महोदय, कडोंमपा यांचेकडे राखून ठेवलेले आहेत.
६- निविदा Website http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.
७- निविदा सादर करण्यापुर्वी आपल्या फॉर्म व डिजीटल स्वाक्षरीची नोंदणी करीता Contact helpline No 18002337315 वर संपर्क साधण्यात यावा.

**सही /-**
**प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी**
**कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, कल्याण**

**जा.क्र. कडोंमपा/जसंवि/मुका/१५५**
**दि. २८/०५/२०२५**



बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
A GOVT. OF INDIA UNDERTAKING
एक परिवार एक बैंक

**नवी मुंबई झोनल ऑफिस**
सिडको जुनी प्रशासकीय इमारत, पी - १७, सेक्टर - १, वाशी, नवी मुंबई.
**ई-मेल :** dzmnvm@mahabank.co.in, legal_nvm@mahabank.co.in, **दूरध्वनी :** ०२२-२०८७८७५१/५२.

**स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना (परिशिष्ट ४-ए)**

**सीक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ व सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या अनुच्छेद ८(६) च्या तरतूदीअंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना.**

सूचना याद्वारे आम जनतेस देण्यात येते व विशेषत: कर्जदार व हमीदारांना देण्यात येते की, खालील विवरणीत स्थावर व जंगम मालमत्ता ज्या बँक ऑफ महाराष्ट्रकडे गहाणवट/ प्रभारित आहेत त्या मालमत्तांचा बँक ऑफ महाराष्ट्रच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे प्रत्यक्ष ताबा घेण्यात आला असून आता कर्जदार व हमीदारांकडून बँक ऑफ महाराष्ट्रच्या खालील निर्देशित थकित रकमेच्या वसुलीसाठी खालील तक्त्यामध्ये नमूद केल्यानुसार **दि. १२.०६.२०२५ रोजी स. ११.०० व दु. ३.००** दरम्यान जशी आहे जेथे आहे, जशी आहे जी आहे व जी काही आहे तेथे आहे तत्त्वावर विक्री करण्यात येत आहे. कर्जदार व हमीदार व कायदेशीर वारस/प्रतिनिधींचा तपशील खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे आहे. कर्जदार व हमीदारांचा तपशील, थकित रक्कम, स्थावर मालमत्तेचे संक्षिप्त विवरण व त्यावरील ज्ञात भार, ताबा प्रकार, राखीव मूल्य व इसारा रक्कम ठेव यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :

| अ. क्र. | शाखेचे नाव | कर्जदार | हमीदार | ज्ञात भारांसमवेत स्थावर मालमत्तेचे संक्षिप्त विवरण | मागणी सूचनेनुसार थकित रक्कम | राखीव मूल्य (रुपयात) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | एआरबी नवी मुंबई | **मे. सुनिता फॅब्रिक्स प्रोप्रा. श्रीमती सुनिता इदनानी** पत्ता : गाला क्र. ३, जेबी इंडस्ट्रीअल एरिया, बजरंग आईस फॅक्टरी, खेमानी, उल्हासनगर २, ठाणे. | **श्री. राजेश इदनानी, श्री. विजय इदनानी** पत्ता : घर क्र. ८, परांजपे चाळ, शिव मंदिराच्या मागे, संध्या छाया अपार्टमेन्टसमोर, अंबरनाथ, जिल्हा ठाणे. | फ्लॅट क्र. ५०१, ५ वा मजला, मन्नत विला, शीट क्र. ६०, रुम क्र. १८५७, ब्लॉक क्र. सी ९२९, वार्ड क्र. ४६, सीटीएस क्र. २४४७७, खाता क्र. ३९डी००१३८४८१००, सर्व्हे क्र. ३९/६६९५, उल्हासनगर कॅम्प ५, जिल्हा ठाणे - ४२१००५. **मोज. ८३५ चौ.फूट चटई क्षेत्र** | दि. ०३.०१.२०१७ रोजीनुसार रु. ९३,८२,०३८/- अधिक दि. ०२.०१.२०१७ पासूनचे मासिक ११.७०% दराने लागू न केलेले व्याज तसेच सर्व मूल्य, प्रभार व खर्च वा त्यावर उद्भवलेले अन्य प्रासंगिक प्रभार. | रु. २१,९०,०००.०० |
| २. | एआरबी नवी मुंबई | **मे. कोचर फॅब्रिक प्रोप्रा. दिनेशकुमार कोचर** पत्ता : गाला क्र. १, १ ला मजला, ग्रामपंचायत घर क्र. १११६, बिल्डिंग क्र. डी ५, श्री अरिहंत कंपाऊंड, रेती बंदर रोड, काल्हेर, भिवंडी, ठाणे - ४२१३०२. | **श्रीमती ममता दिनेशकुमार कोचर** पत्ता : गाला क्र. १, १ ला मजला, ग्रामपंचायत घर क्र. १११६, बिल्डिंग क्र. डी ५, श्री अरिहंत कंपाऊंड, रेती बंदर रोड, काल्हेर, भिवंडी, ठाणे - ४२१३०२. | गाला क्र. १, १ ला मजला, ग्रामपंचायत घर क्र. १११६, बिल्डिंग क्र. डी ५, श्री अरिहंत कंपाऊंड, रेती बंदर रोड, काल्हेर, भिवंडी, ठाणे - ४२१३०२. **मोज. २४३२.८१ चौ.फूट बिल्टअप** | मुदत कर्ज व एफआयटीएलअंतर्गत दि. १८.०४.२०२२ रोजीनुसार रु. ३४,३२,८९७/- अधिक दि. ०२.०४.२०२२ पासूनचे मासिक ८.२५% दराने लागू न केलेले व्याज तसेच सर्व मूल्य, प्रभार व खर्च वा त्यावर उद्भवलेले अन्य प्रासंगिक प्रभार. | रु. ३६,५०,०००.०० |
| ३. | एआरबी नवी मुंबई | **मे. अल्फा मरिन सर्विसेस श्रीमती झरिना हसन कच्छी, श्रीमती हलिमा इय्यास कच्छी** | **श्री. इस्माईल हसन कच्छी, इक्बाल हसन कच्छी** | कर्मशिअल प्रिमाईसेस गोडाऊन क्र. १, तळमजला, न्यू कॅंडल क्वीन सीएचएस लि., १९ए, वीर सावरकर मार्ग, माहिम, मुंबई - ४०० ०१६. **मोज. ३८५ चौ.फूट चटई क्षेत्र** | दि. ३०.०४.२०१४ रोजीनुसार कॅश क्रेडिट खाते थकबाकीकरिता रु. ६४,५३,५७५/- व मुदत कर्जखात्याअंतर्गत रु. ३,१७,४९,७५२/- अधिक पुढील व्याज तसेच सर्व मूल्य, प्रभार व खर्च वा त्यावर उद्भवलेले अन्य प्रासंगिक प्रभार. | रु. ५६,००,०००.०० |
| ४. | एआरबी नवी मुंबई | **श्री. कोमल तोलानी (कर्जदार) श्री. गुलाब तोलानी (सह-कर्जदार) श्री. अजय तोलानी (सह-कर्जदार) श्री. विजय तोलानी (सह-कर्जदार)** पत्ता : तोलानी भवन, बरैक क्र. १६९६, रुम क्र. २, सेक्टर २५, उल्हासनगर कॅम्प ४- ४२१००४. | **श्री. हितेश गुलाब तोलानी** पत्ता : तोलानी भवन, बरैक क्र. १६९६, रुम क्र. २, सेक्शन २५,, उल्हासनगर कॅम्प ४- ४२१००४. | फ्लॅट क्र. २०१, २ रा मजला, मेरिडियन अपार्टमेन्ट, ब्लॉक क्र. ए ५८३, रुम क्र. ११६६, शहर सर्व्हे क्र. २२३७३, शीट क्र. ३८, कृष्णा नगर, सेक्शन २५, उल्हासनगर, जिल्हा ठाणे - ४२१००४. **क्षेत्र : मोज. ६४० चौ.फूट** | दि. १९.०७.२०२२ रोजीनुसार रु. ६३,३७,९२८/- अधिक दि. १९.०७.२०२२ पासूनचे मासिक ९.४०% दराने लागू न केलेले व्याज तसेच सर्व मूल्य, प्रभार व खर्च वा त्यावर उद्भवलेले अन्य प्रासंगिक प्रभार. | रु. १७,५०,०००.०० |
| ५. | एआरबी नवी मुंबई | **श्री. आनंदकुमार एच श्रीवास्तव श्रीमती संगीता आनंदकुमार श्रीवास्तव** फ्लॅट क्र. ८, रुबिना अपार्टमेन्ट, उरण, कारंजा रोड, उरण, रायगड- ४००७०२. | एनए | बंगला क्र. आरएससी ११, प्लॉट क्र. ३६, पाचपाखाडी, वीर सावरकर नगर, ठाणे पश्चिम- ४००६०६. मोजमापित २००० चौ.फूट व धारक सीटीएस /सर्व्हे क्र. प्लॉट क्र. ३६, सहित बिल्डिंग व संरचना/रहिवासी ब्लॉक बांधकामे आदी, मोजमापित १९८७ चौ.फूट (चटई क्षेत्र) तळमजल्याच्या एकत्रित सलग्न+ दोन मजले. | दि. ०३.०५.२०१९ रोजी रु. २,२२,९१,८२९.००/- अधिक दि. २६.०४.२०२१ पासूनचे मासिक ८.८५% दराने लागू न केलेले व्याज तसेच सर्व मूल्य, प्रभार व खर्च वा त्यावर उद्भवलेले अन्य